**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
A.Y. 2023-2024

# कोयना एज्युकेशन सोसायटी इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** कोयना एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटण या कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मुंबई यांनी घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या वार्षिक परीक्षेमध्ये उज्ज्वल यश संपादन केले.

राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मुंबई यांनी जून २०२३ मध्ये घेतलेल्या हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी आणि सर्टिफिकेट कोर्स इन फूड अँड बेव्हरेज सर्व्हिस या अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी परीक्षेत नीलेश खाडे याने ७८ टक्के गुण मिळवून सातारा विभागात प्रथम क्रमांक, अभिषेक आंधळे याने ७६.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय आणि वेदांतिका पवार हिने ७५.६७ टक्के गुण मिळवून तृतीय त्याचबरोबर सर्टिफिकेट कोर्स इन फूड अँड बेव्हरेज सर्व्हिस या परीक्षेत धनराज देसाई याने ८०.५० टक्के गुण मिळवून प्रथम, भावना सूर्यवंशी हिने ७५ टक्के गुण मिळवून द्वितीय आणि अनिकेत यादव याने ७३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविले. विद्यार्थ्यांनी देखील या दोन्ही अभ्यासक्रमाच्या परीक्षेत सर्वोत्तम यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, सातारा जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण यांनी कौतुक केले. (वा.प्र.)